आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
१५ ऑगस्ट २०२६ - शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- २०२७ पर्यंत विकसित भारताचं उद्दिष्ट साध्य करण्यासाठी प्रधनमंत्र्यांनी केलं सप्तधारा सूत्राचं आवाहन

- गरीब आणि मध्यमवर्गीय युवकांना स्पर्धापरीक्षांसाठी मोफत ऑनलाईन प्रशिक्षण देण्याची प्रधानमंत्र्यांची घोषणा

- देशभरात ८० व्या स्वातंत्र्यदिन सोहळ्याचा उत्साह/ देशोदेशीहून भारताला शुभेच्छा

- इस्त्रायलच्या हवाई हल्ल्यांत दक्षिण लेबनॉनमधे ७ जण ठार तीन जखमी

**आणि**

- भारतीय क्रिकेट संघाचा ६०० वा कसोटी सामना श्रीलंकेत गॉल इथं सुरु

<><><><><>

देशाचा ८०वा स्वातंत्र्यदिन आज देशभरात साजरा होत आहे. नवी दिल्ली इथं लालकिल्ल्यावर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ध्वजारोहणाचा मुख्य सोहळा झाला. गेल्या १२ वर्षात केंद्र सरकारच्या उपाययोजनांमुळे २५ कोटी नागरिक दारिद्र्यरेषा ओलांडून वर आले असल्याचं त्यांनी सांगितलं. संरक्षण सामुग्री उत्पादनात चौपट वाढ, खादी आणि ग्रामोद्याग उत्पदनात सुमारे ५ पट वाढ, इलेक्ट्रॉनिक उपकरण निर्मितीत ७ पट तर आधुनिक रेल्वे डब्यांच्या उत्पादनात २१ पट आणि मोबाईल फोन उत्पादनात ३३ पट वाढ झाल्याचं ते म्हणाले. प्रशासनात सुटसुटीतपणा, निरुपयोगी किंवा कालबाह्य कायदे रद्द करणं, ही नागरिककेंद्री सुशासनाची वैशिष्ट्य आहेत. वंदेमातरम् या गीताला यावर्षी १५० वर्ष पूर्ण होत असताना प्रथमच लालकिल्ल्यावरच्या कार्यक्रमात पूर्ण वंदेमातरम् म्हटलं गेलं. प्रधानमंत्र्यांनी याबद्दल आनंद व्यक्त केला.

२०४७ पर्यंत विकसित भारत घडवण्याच्या मार्गावर देशानं अनेक आव्हानं यशस्वीपणे पेलली असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. कोविड महामारी, युक्रेन आणि पश्चिम आशियातल्या भूराजकीय संघर्षाचा उल्लेख त्यांनी केला. इंधन तेलासाठी भारताला इतर देशांवर अवलंबून रहावं लागतं त्यामुळे आता समुद्रतळाशी इंधन तेलाकरता

उत्खनन करुन नवीन खाणी शोधण्याला सरकारने प्राधान्य दिलं आहे. सध्या देशात गॅस, पेट्रोल आणि युरियाचा पुरेसा पुरवठा होत असल्याची माहिती त्यांनी दिली. तसंच ऊर्जेसाठी इतर स्त्रोतांचा वापर करण्याला सरकारने प्राधान्य दिलं आहे, असं ते म्हणाले.

देशात उद्योग व्यापाराला चालना देण्यासाठी ४० देशांबरोबर मुक्त व्यापार करार केले असल्याचं सांगून त्यांनी भारतीय मालाचा दर्जा आंतरराष्ट्रीय स्तरावर वाखाणला जाईल अशी अपेक्षा व्यक्त केली.

कारखाने, कृषी आणि अन्न उत्पादन, तंत्रज्ञान आणि नवोन्मेष, गती शक्ती, संरक्षण क्षमता, पर्यावरणानुकूल अर्थव्यवस्था आणि समुद्री साधनसंपत्तीवर आधारित अर्थव्यवस्था तसंच सांस्कृतिक मूल्याचं जतन आणि संवर्धन या सप्तधारा सूत्रांच्या अनुषंगाने विकास घडवण्याचं आवाहन त्यांनी यावेळी केलं....

- - - **होल्ड- बाईट प्रधानमंत्री** - - - -

गरीब आणि मध्यमवर्गीय कुटुंबातल्या युवकांना स्पर्धा परीक्षांसाठी मोफत ऑनलाईन प्रशिक्षण देण्याची घोषणा मोदी यांनी केली. सर्वोत्कृष्ट शिक्षकांचं मार्गदर्शन सर्वांसाठी उपलब्ध राहील, यामुळे कोचिंग क्लासवर मध्यमवर्गियांना करावा लागणारा करोडो रुपये खर्च वाचेल असं ते म्हणाले. आगामी जनगणनेच्या वेळी कुटुंबाची बिनचूक माहीती संगणकावर भरली जावी याकरता तंत्रज्ञान स्नेही तरुण पिढीने पुढाकार घ्यावा असं आवाहन त्यांनी केलं.

देश नक्षलमुक्त करण्याचा संकल्प पूर्ण झाला असून पूर्वीच्या नक्षल प्रभावित भागात आता विकास, विश्वास आणि प्रयास यांचा तिरंगा दिमाखाने फडकत असल्याचं ते म्हणाले.

देशातल्या पूरग्रस्त भागातल्या नागरिकांप्रति त्यांनी सहवेदना व्यक्त केली आणि पूर्ण देश त्यांच्या पाठीशी असल्याचा दिलासा त्यांना दिला.

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज ८० व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त नवी दिल्ली इथे राष्ट्रीय युद्ध स्मारकावर पुष्पचक्र वाहून देशासाठी बलिदान देणाऱ्या शूरवीरांना आदरांजली वाहिली. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, संरक्षण राज्यमंत्री संजय सेठ, संरक्षणदल प्रमुख जनरल एस राजा सुब्रमणि , लष्कर, वायुदल आणि नौदल या तीनही सेनादलाचे प्रमुख तसंच इतर अधिकारी यावेळी उपस्थित होते.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज दिल्लीत राजघाटावर जाऊन राष्ट्रपिता महात्मा गांधी यांना आदरांजली वाहिली.

**<><><><>**

उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन यांनी देशवासियांना ८०व्या स्वातंत्र्यदिनाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. स्वातंत्र्यप्राप्तीसाठी बलिदान देणाऱ्या स्वातंत्र्ययोद्धयांना तसंच देशाच्या सीमा आणि सार्वभौमत्वाचं रक्षण करणाऱ्या सशस्त्र सेनादलांना आज देश वंदन करत आहे असं त्यांनी संदेशात म्हटलं आहे.

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी देखील देशवासियांना स्वातंत्र्यदिनाच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

देशोदेशीचे नेते आणि आंतरराष्ट्रीय संघटनांनीही भारताला स्वातंत्र्यदिनाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. भारताचा लोकशाही प्रवास, सांस्कृतिक वारसा तसंच प्रादेशिक आणि जागतिक सहकार्याबाबत विस्तारत असलेल्या भूमिकेची त्यांनी प्रशंसा केली आहे. भारत आणि अमेरिकेचे बंध दृढ होत असल्याचं अमेरिकेचे मंत्री मार्को रुबिओ यांनी म्हटलं आहे. तर दोन्ही देशांत कौशल्य, डिजीटलीकरण, शाश्वतता आणि प्रगत उत्पादन क्षेत्रात सहकार्यात वाढ होत असल्याचं सिंगापूरचे अध्यक्ष थर्मन षण्मुगरत्नम यांनी म्हटलं आहे. याशिवाय इस्त्राएल, अर्जेंटिना, श्रीलंका, नेपाळ, ऑस्ट्रेलिया, फ्रांस, मालदीव या देशांच्या नेत्यांनीही भारताला स्वातंत्र्यदिनाच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

**<><><><>**

देशात सर्वत्र ८०व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त ध्वजारोहणाचे कार्यक्रम झाले. मुंबईत झालेल्या कार्यक्रमांविषयी अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून...

**- - होल्ड - कॅप्सूल - -**

*(देशाच्या ८० व्या स्वातंत्र्यदिनाचा उत्साह मुंबईत स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येपासूनच सुरू झाला आहे. मुंबईतल्या महापालिका मुख्यालय इमारत, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस तसंच अन्य वारसा स्थळांच्या इमारती काल सायंकाळपासूनच तिरंगी रंगात न्हाऊन निघाल्या आहेत. स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील विविध विमानतळ आस्थापनांवर तिरंग्याच्या रंगांमध्ये आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे.*

*स्वातंत्र्य दिनानिमित्त महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मंत्रालयात ध्वजारोहण करण्यात आलं. या प्रसंगी ते म्हणाले की विकसित भारत होण्याच्या दिशेने देशाच्या प्रवासात महाराष्ट्र महत्त्वाची भूमिका निभावेल…*

***- - - होल्ड - फडणवीस बाईट- - -***

*मुंबईतल्या विधान भवन इथं महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती प्राध्यापक राम शिंदे यांच्या हस्ते, तसंच महाराष्ट्र विधानपरिषदेचे उपसभापती सचिन अहिर यांच्या प्रमुख उपस्थितीत ध्वजारोहण करण्यात आलं.*

*विधान भवन इथं विधानपरिषदेचे सभापती प्राध्यापक राम शिंदे यांच्या हस्ते, तसंच उपसभापती सचिन अहिर यांच्या प्रमुख उपस्थितीत ध्वजारोहण करण्यात आलं.*

*मुंबई उच्च न्यायालयाचे कार्यवाहक मुख्य न्यायाधीश रवींद्र घुगे यांच्या हस्ते मुंबई उच्च न्यायालय येथे ध्वजारोहण करण्यात आलं. पश्चिम आणि मध्य रेल्वे मुख्यालयांमध्येही ध्वजारोहण समारंभ पार पडला.*

*याखेरीज शाळा महाविद्यालयं, निमसरकारी आणि बिगरसरकरी संस्था संघटना, विविध राजकीय पक्षांची कार्यालयं,गृहसंकुलं इत्यादी ठिकाणी मुंबईकरांनी ध्वजवंदना करुन स्वातंत्र्यदिन साजरा केला. विविध दुकानं, मॉल्स आणि शोपिंग सेटर्समधे आज तिरंगी सजावट लक्ष वेधून घेत आहे.)*

**<><><><><>**

इस्त्रायलने आज सकाळी दक्षिण लेबनॉनवर केलेल्या हवाई हल्ल्यांत ७ जण ठार तर तीन जण जखमी झाल्याचं लेबनॉनच्या सरकारी वृत्तवाहिनीने म्हटलं आहे. लेबनॉन आणि इस्त्राईलने २६ जून रोजी केलेल्या करारानंतरचा हा सर्वात घातक  हल्ला होता. या करारानुसार इराणचा पाठिंबा असलेल्या हिजबोल्ला अतिरेकी गटाला निष्क्रिय करण्याच्या बदल्यात इस्त्राएल लेबनॉनमधून माघार घेणार होता.

**<><><><><>**

भारतीय क्रिकेट संघाचा ६०० वा कसोटी क्रिकेट सामना आज श्रीलंकेत गॉल इथं सुरू झाला. हा आकडा पार करणारा भारत जगातला तिसरा देश आहे. भारताने पहिला कसोटी सामना १९३२ साली इंग्लंडविरुद्ध बर्मिंगहॅम इथे खेळला होता. आजवर भारताने खेळलेल्या कसोटी सामन्यांमधले १८६ म्हणजेच ३१ टक्के सामने जिंकले आहेत. आज सुरू

झालेल्या सामन्यात शेवटची बातमी हाती आली तेव्हा भारताच्या १ गडी बाद १०१ धावा झाल्या होत्या.

**//<><><><><>//**